।। श्री ।।

श्रीदासराम ग्रंथमाला - पुष्प - २२

# श्रीरामनिकेतन

## (परिचय पत्रिका)

संकलक आणि संपादक
**प्रा. डॉ. के. वा. आपटे**

प्रकाशक
**संदीप सुधाकर रेगोडकर**

पहिली आवृत्ति

सांगली

इसवी सन २०११

श्रीदासराम ग्रंथमाला : पुष्प २२
श्रीरामनिकेतन (परिचय पत्रिका)

**प्रकाशक** : श्री. संदीप सुधाकर रेगोडकर
विसावा चौक, गांवभाग, सांगली

**प्रथम आवृत्ति** : इ.स. २०११

**प्रकाशन दिन** : पौष शु.५, शके १९३२
रविवार, दिनांक ०९/०१/२०११

© सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

**मुद्रक** : श्री. अनिल लोखंडे
श्रीदासराम ऑफसेट, सांगली.
दूरध्वनी-(०२३३) २३२२७२९

**मुखपृष्ठ व अक्षरजुळवणी :** श्री. अनंत अजित लोखंडे

**प्रसाद मूल्य** : रु.१०/- मात्र

# अनुक्रम

प्रकाशकाचे शब्द ..........................................एक

१) श्रीरामनिकेतन..........................................१
२) अंताजीपंत केळकर ..................................२
३) गोविंद ऊर्फ बापूरावजी ऊर्फ मामामहाराज.............४
४) दासराममहाराज.......................................६
५) चंद्रशेखरअण्णा.......................................१०
६) श्रीरामनिकेतनची स्थापना आणि विकास..............११
७) श्रीरामनिकेतनाची थोरवी..............................१५
८) श्रीरामनिकेतन : नित्याचे कार्यक्रम....................१८
९) श्रीरामनिकेतन : नैमित्तिक कार्यक्रम...................१९
१०) आराधनेचे कार्यक्रम.................................२३
११) कार्यक्रमांची तिथिवार सूची.........................२४

## प्रकाशकाचे निवेदन

श्रीरामनिकेतन (परिचय पत्रिका ) हे पुस्तक वाचकांना उपलब्ध करून देताना मला आज अतिशय आनंद होत आहे. श्रीरामनिकेतन या परिचय पुस्तिकेमध्ये संपूर्ण केळकर घराण्याची थोडक्यात माहिती अंतर्भूत केली आहे. श्रीरामनिकेतन हे पारमार्थिक मंदिर असून येथे दररोज वेगवेगळ्या संप्रदायांचे/पंथांचे लोक दर्शनास येत असतात. तथापि त्यांना या पारमार्थिक मंदिराविषयी जादा माहिती नसते. तसेच तोंडी माहिती देण्यालाही मर्यादा पडतात. त्यामुळे श्रीरामनिकेतनाविषयी थोडक्यात परिचय पत्रिका प्रकाशित करणे आवश्यक आहे असे माझे परममित्र श्री. दीपक केळकर एकदा बोलून गेले होते. तसेच त्यांनी ही परिचय पत्रिका प. पू. श्री. दासराममहाराजांचे अंतरंगातील शिष्य प्रा.डॉ.के.वा.आपटे यांनी लिहिली आहे असे बोलले होते. हा धागा पकडून मी ही श्रीरामनिकेतन परिचय पत्रिका प्रकाशित करतो असे मी श्री. दीपक केळकर यांना बोललो तसेच प.पू.श्री अण्णांनाही बोललो व त्यास त्यांनी लगेच अनुमती दिली. यानुसार हे पुस्तक मी प्रकाशित करीत आहे.

आपणही एखादे पुस्तक प्रकाशित करावे अशी माझी बरेच दिवसापासून इच्छा होती. ही इच्छा आज या पुस्तकरुपाने प.पू.श्रीअण्णांनी माझ्याकडून करवून घेतली हे माझे भाग्य आहे असे मला वाटते.

श्रीरामनिकेतन हे पुस्तक साकार होण्यामागे अनेकांचे सहकार्य लाभले आहे. हे पुस्तक (परिचय पत्रिका) लिहिण्याचे काम आमचे प्रा.डॉ.के.वा.आपटे यांनी अत्यंत सुरेखपणे केले आहे



याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. तसेच या पुस्तकाची कच्ची मुद्रिते तपासण्याचे काम माझे मित्र प्रा. नारायण के.आपटे व श्री. दीपक केळकर यांनी केले याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. तसेच या पुस्तक छपाईचे काम आमचे श्री. बाळासाहेब लोखंडे यांच्या श्रीदासराम ऑफसेट या प्रेसने अत्यंत चांगल्या तऱ्हेने केले आहे याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. अशी सेवा आमच्या हातून घडावी अशी प्रार्थना प.पू.श्री दासराममहाराज केळकर व प.पू.श्रीअण्णांचे चरणी करतो आणि या ठिकाणी थांबतो.

सांगली. संदीप सुधाकर रेगोडकर
१७ डिसेंबर २०१०

# श्रीरामनिकेतन

दक्षिणाभिमुख जाळीच्या मुख्य दरवाजातून आत शिरताच, आणि पडवी व ओटा ओलांडून पुढे पहाताच समोरच श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे भव्य तैलचित्र दृष्टीस पडते, तसेच त्याच्या दोन्ही बाजूला असणारी निंबरगीकरमहाराज व ज्ञानेश्वरमहाराज यांची तैलचित्रे उठून दिसतात. उजव्या बाजूला शिसवी लाकडाचा मोठा देव्हारा डोळ्यांत भरतो. तर डाव्या बाजूला श्रीमामामहाराज आणि श्रीदासराममहाराज यांची काळ्या पाषाणातील सिंहासने नजरेस येतात. त्यांचे वरील बाजूला भिंतीवर अंताजीपंत, मामामहाराज आणि दासराममहाराज यांची आकर्षक चित्रे मनावर परिणाम करतात, आणि चारही बाजूला भिंतीवर संतसज्जनांच्या फोटोंची दाटीवाटीने असणारी गर्दीच गर्दी दिसून येते. त्यांत चिमड संप्रदायातील संत आणि अन्य संप्रदायातील साधु यांचा भरणा आढळतो.

असे आहे हे सध्याचे रामनिकेतन.

रामनिकेतन हे जुन्या सांगलीतील केळकर कुळाचे वसतिस्थान तसेच देवस्थान आहे. केळकर घराण्यातील चार पिढ्यांतील महान् पुरुषांचा हातभार लागून रामनिकेतनला सध्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. केळकर कुळातील ज्या महात्म्यांनी रामनिकेतनची स्थापना व जोपासना केली त्यांची माहिती प्रथम दिली आहे आणि नंतर रामनिकेतनचा विकास कसकसा होत गेला हे सांगून, येथे होणाऱ्या नित्यनैमित्तिक कार्यक्रमांची संक्षिप्त माहिती दिली आहे.

# अंताजीपंत केळकर

कोकणातील आचरे या गावातून श्री. गंगाधर या नावाचे सुशील गृहस्थ आपल्या पार्वती या पत्नीसह प्रथम सांगलीत रहावयास आले. आणि त्यांनी कवड्यांचा व्यापार सुरू केला. त्यावेळी कवडी ही कवडीमोल नसून किंमतवान् होती. त्यामुळे गंगाधरांचा व्यापारात चांगला जम बसला. पूर्वकालीन गृहस्थाप्रमाणे गंगाधर हे स्नान-संध्या,पूजा अर्चा, गायत्री जप करीत. त्यांना एकच पुत्र झाला. त्याचे नाव अनंत. अनंत हा अंताजीपंत अथवा नाना या नावांनी ओळखला जाई.

अंताजीपंतांचे शिक्षण त्यावेळच्या मराठी व्हर्नाक्युलर फायनल पर्यंत झाले होते. सांगली संस्थानच्या शिक्षण खात्यातील एज्युकेशनल इन्स्पेक्टरच्या ऑफिसात हेडक्लार्क म्हणून ते नोकरी करीत होते. ते थोडीफार सावकारीही करीत. या दोन व्यवसायांत मिळालेल्या पैशांचा वापर करून त्यांनी सांगलीच्या गावभागात रहाण्यासाठी एक वाडा घेतला. हा वाडा हेच रामनिकेतनचे मूळ स्वरूप होय.

अनंतरावजी अत्यंत धार्मिक होते. सांगलीतच रहाणाऱ्या श्री. लक्ष्मण दीक्षित या वेदशास्त्रसंपन्न अधिकारी पुरुषाकडून त्यांनी पार्थिव पूजेचे व्रत घेतले व ते आमरण पाळले. ते रोज पार्थिव पूजा झाल्यावर ॐ नमः शिवाय या षडक्षरी मंत्राचा रोज बारा हजार जप करीत. अनंतरावजी हे अधूनमधून नृसिंहवाडीला टेंबे स्वामी व त्यांचे पट्टशिष्य दीक्षित स्वामी यांचे दर्शनास जात. त्या दोन्हीही



सत्पुरुषांनी अनंतरावांना एकेक रुपया प्रसाद म्हणून दिला होता. हे दोन्हीही रुपये आजही केळकरांच्या घरात जपून ठेवलेले आहेत.

अनंतरावांचे दोन विवाह झाले होते. त्यांची द्वितीय पत्नी लक्ष्मी ही तासगावच्या आगरकर कुळातील होती. तिने गोंदवलेकरमहाराजांचा अनुग्रह घेतलेला होता. तिच्याबरोबर अनंतराव गोंदवलेकरमहाराजांचेकडेही जात. अनंतरावांवर गोंदवलेकरमहाराजांची मर्जी होती.

इ.स. १९०१मध्ये चिमड संप्रदायातील सुप्रसिद्ध संत हणमंत पांडुरंग ऊर्फ तात्यासाहेबमहाराज कोटणीस हे सांगलीस रहावयास आले. त्यांनी आपले घरी रोज रात्री हरिकीर्तने सुरू केली. अनंतरावजी त्यांच्या कीर्तनास जाऊ लागले. ते झांज वाजवून कीर्तनात साथ करीत आणि विश्रांतीचे वेळी पदही म्हणीत. पुढे त्यांनी कोटणीसमहाराजांचा उपदेशानुग्रह घेतला आणि ते चिमड संप्रदायाचे साधन करू लागले. त्यांना काव्यस्फूर्तीही होती. त्यांनी गोंदवलेकरमहाराज व कोटणीसमहाराज यांची थोरवी गाणारी पदे रचली. त्यांची पदे पुस्तकरूपाने प्रकाशित झालेली आहेत.

इ.स. १९२४ सालापासून त्यांचे चिरंजीव गोविंद (मामामहाराज) यांनी नित्यकीर्तन सुरू केले. त्या कीर्तनात नाना साथ करीत हे लक्षणीय आहे.

"शंकरा अंत करावा बरवा" असे ध्रुवपद असणारे त्यांचे एक पद आहे. त्यांची प्रार्थना शंकराने ऐकली. शिवनामाचा उच्चार करीत अनंतराव इ.स. १९३४मध्ये अनंतात विलीन झाले.

# गोविंद ऊर्फ बापूरावजी ऊर्फ मामामहाराज

अनंतरावजींना एकच सुपुत्र झाला. त्याचे नांव गोविंद. त्याला घरी बापू म्हणत म्हणून पुढे ते बापूराव झाले. त्यांचे भाचे त्यांना मामा म्हणत म्हणून ते पुढे मामामहाराज झाले. गोविंदाचा जन्म शके १८१२मध्ये झाला. आपल्या वडिलांप्रमाणे गोविंद हाही अत्यंत धार्मिक होता. लहानपणापासून मामामहाराजांची ज्ञानेश्वरमहाराजांवर भक्ति होती. ते ज्ञानेश्वरमहाराजांचे भजन करीत.

त्या काळातील इंग्रजी सात इयत्तापर्यंत म्हणजे पूर्वीच्या मॅट्रिकपर्यंत त्यांचे शालेय शिक्षण झाले होते. त्यांनी ड्रॉइंगच्या तीन परीक्षाही दिल्या होत्या. शिक्षणानंतर त्यांनी काही काळ सांगलीच्या मुन्सफ कोर्टात उमेदवारी केली मग पुढे सिटी हायस्कूलमध्ये त्यांनी शिक्षकाची नोकरी पत्करली.

प्रथमपासूनच मन धार्मिक व वैराग्यपूर्ण असल्याने, विवाह न करता परमार्थच करावा असा मामामहाराजांचा मनसुबा होता. तर बापूने विवाह करून वंश पुढे चालू ठेवावा अशी त्यांच्या मातापित्यांची इच्छा होती. तेव्हा मामामहाराजांनी एक तोडगा काढला. ते वडिलांना म्हणाले, ‘‘नाना, मी आळंदीस जाऊन ज्ञानेश्वरमहाराजांची आराधना करतो. आणि मग ते जसा कौल देतील तसे करतो.’’ तसे करण्यास नाना कबूल झाले. आळंदीस जाऊन मामांनी ज्ञानेश्वरीचे पारायण व अन्य उपासना केली. काही दिवस लोटले. एके दिवशी ज्ञानेश्वरमहाराज मामांचे पुढे साक्षात् प्रगट झाले आणि त्यांनी गोविंदास



सांगितले, ‘‘गोविंदा, तू प्रपंच करीतच परमार्थ कर. तुझा परमार्थही पूर्ण होईल,’’ यावेळी मामांना ज्या स्वरूपात ज्ञानेश्वरांचे दर्शन झाले ते त्यांनी रेखांकित करून ठेवले. ते आजही केळकरांच्या घरी दिसून येते.

मामामहाराज सांगलीस परतले. ज्ञानेश्वरांचा अभिप्राय त्यांनी मातापित्यांना सांगितला. लगेच बापूसाठी वधूसंशोधन सुरू झाले. कागवाडच्या फाटक घराण्यातील एक कन्या वधू म्हणून नेमस्त करण्यात आली. बापूचा विवाह झाला. त्याच्या पत्नीचे नाव इंदिरा असे ठेवण्यात आले.

उपनयनानंतरच्या काळात मामामहाराजांनी अनेक पारायणे व पुरश्चरणे केली. वाल्मीकि रामायण, तुलसीदास रामायण, ज्ञानेश्वरी, गुरुचरित्र आणि दासबोध यांची पारायणे तसेच गायत्री पुरश्चरण आणि साडेतीन कोटी रामनामाची पुरश्चरणे त्यांनी केली होती. मामामहाराज हे तात्यासाहेब कोटणीसमहाराजांच्या कीर्तनासही जात. त्यांना कोटणीसमहाराजांचा अनुग्रह घ्यावयाचा होता. पण कोटणीसमहाराजांनी त्यांना अनुग्रहासाठी चिमडास चिमडमठाधिपति नारायणमहाराज यरगट्टीकर यांचेकडे पाठविले. चिमडास जाऊन मामामहाराजांनी अनुग्रह घेतला आणि त्यांनी परत आल्यावर कठोर साधनास प्रारंभ केला. सिटी हायस्कूलमध्ये शिक्षक असताना मामामहाराजांनी साडेतीन कोटी रामनामाचे पुरश्चरण सुरू केले. त्यासाठी गावाची वेस ओलांडायची नाही असा नियम होता. त्यात त्यांची बदली तासगांवला झाली. पुरश्चरणात अडचण येते हे लक्षात घेऊन

मामामहाराजांनी तात्काळ नोकरीचे त्यागपत्र दिले.

इ.स. १९२४च्या पौष महिन्यात कोटणीसमहाराजांचे निर्याण झाले. निर्याणानंतर काही दिवसांत कोटणीसमहाराज मामांचे घरी माघ वद्य तृतीयेस मामामहाराजांचे पुढे साक्षात् प्रगट झाले व त्यांनी मामामहाराजांना नित्यकीर्तनाची आज्ञा दिली. मामांनी नित्यकीर्तन करण्याचा नेम निर्याणापर्यंत पाळला. इ.स. १९२४ ते १९६२ या अडतीस वर्षांच्या काळात मामामहाराजांचे अखंड कीर्तन चालू राहिले.

कीर्तन चालू असतानाच मामामहाराजांनी 'रामपाठ' नावाचा लघुग्रंथ रचला अणि कोटणीसमहाराजांच्या निर्याणानंतर हनुमद्गुरुचरित्र-बोधसार नावाचा ओवीबद्ध ग्रंथ रचला. हे दोन्हीही ग्रंथ मामांच्या हयातीतच प्रकाशित झाले.

रामानंदमहाराज खटावकर हे मामामहाराजांना निळोबारायांचा अवतार म्हणत तर मिरीकरमहाराज आणि पांडुरंगमहाराज ताम्हनकर हे मामामहाराजांना एकनाथांचा अवतार म्हणत. बुधगावचे विदेही संत गुंडूबुवा हे कधीकधी मामामहाराजांच्या कीर्तनास येत आणि कीर्तनरंगी नाचत असत.''गोंदा पुरा आहे'' असे ते म्हणत. गोंदा म्हणजे गोविंद म्हणजे मामामहाराज केळकर.

## दासराममहाराज

मामामहाराजांना गंगू व राम अशी दोन अपत्ये होती. औरवाड गावच्या वजीरबाबा अवलिया या संताच्या कृपाशीर्वादाने रामाचा जन्म इ.स. १९२०मध्ये झाला. रामाला वयाच्या चौदाव्या दिवशी तात्यासाहेब कोटणीसमहाराजांचा दृष्टिद्वारा अनुग्रह झाला. त्यांच्याच सांगण्यानुसार बाळाचे नाव 'राम' असे ठेवण्यात आले.



''हा राम बालपणापासून कीर्तन करील''असे आशीर्वचन कोटणीसमहाराजांनी उच्चारले. त्याप्रमाणे रामाने वयाच्या पाचव्या वर्षीच पहिले कीर्तन केले. वयाच्या सातव्या वर्षी रामाला 'आत्मयाची काव्यस्फूर्ति' झाली आणि त्याचे आध्यात्मिक लेखन सुरू झाले. पद्यात्मक लेखनात त्याने 'दासराम' ही मुद्रिका वापरली. वयाच्या नवव्या वर्षी दासरामांनी दररोज रामनामाचा तेरा हजार जप सुरू केला. आणि याच वर्षी त्यांनी 'रामदासबोध' हा लघुग्रंथ रचला. तो प्रसिद्ध झाला आहे.

बालपणी दासराम हे मामामहाराजांच्या कीर्तनात नाचत, मामांना प्रदक्षिणा घालीत अथवा झांज वाजवून साथ करीत. पुढे ते पेटी वाजवून मामांच्या कीर्तनात साथ करू लागले.

दासरामांना घरी दादा असे म्हणत.दादांचे शिक्षण मॅट्रिकपर्यंत झाले होते. शिक्षणानंतर त्यांनी काही काळ संस्थानच्या ट्रेझरी ऑफिसात नोकरी केली. पुढे सांगली संस्थान महाराष्ट्र राज्यात विलीन झाले. काही काळाने त्यांची बदली परगावी झाली. तेव्हा त्यांनी त्यागपत्र देऊन नोकरीला रामराम ठोकला. दासराममहाराज नेहमी म्हणत,''नोकरीसाठी माझा जन्म नाही.''

यथावकाश इ.स.१९४२मध्ये दासरामांचा इचलकरंजीच्या

गोवंडे कुटुंबातील मालती नामक कन्येशी विवाह झाला. तिचे सासरचे नाव सीता. रामसीता या दांपत्याला चंद्रशेखर, सूर्यकांत, अनल, अनिलप्रभु असे चार गुणवान् पुत्र झाले.

विवाहापूर्वी दादांच्या जीवनात सर्वांत मोठा चमत्कार घडला होता. नागाप्पाण्णामहाराजांच्या वचनानुसार चिमड संप्रदायाचे प्रवर्तक श्रीनिंबरगीकरमहाराज हे आपल्या निर्याणानंतर इ.स. १९३९मध्ये श्रीदासरामांच्या पुढे साक्षात् प्रगट झाले व एक कानडी पद त्यांनी चालीत म्हटले. ते लक्षात ठेवून दादांनी ते देवनागरी लिपीत लिहून ठेवले. त्यानंतर अनेक वर्षे निंबरगीकरमहाराज श्रीदादांना कानडी, इंग्रजी व मराठी भाषांत पदे श्रुत करीत राहिले. त्या सर्व पदांचा संग्रह ''श्रीगुरुलिंगगीता'' या ग्रंथात प्रकाशित झाला आहे. निंबरगीकरमहाराजांच्या आज्ञेप्रमाणे श्रीदासराम हे उपदेशानुग्रह देऊ लागले. त्यांचे अनेक शिष्य होते. त्यांत निरक्षर माणसांपासून उच्चशिक्षित माणसापर्यंतचे लोक होते.

नोकरीचा राजीनामा दिल्यानंतर, मामामहाराजांच्या कीर्तनात पेटीवर साथ करणे आणि पारमार्थिक लेखन करणे यांत त्यांचा वेळ जाई. अनेक ग्रंथावर टीका, काही ग्रंथांचे भाषांतर इत्यादि कार्य त्यांनी केले. त्यांनी स्वतंत्रपणे केलेले लेखन म्हणजे अभंग-पदे, भजने व आरत्या. ही तीनही प्रकारचे साहित्य आज प्रकाशितरूपात उपलब्ध आहे. श्रीदासराम अधूनमधून कीर्तन, प्रवचन करीत. त्यासाठी त्यांना बाहेरची बोलावणी येत.



श्रीदासराम हे मामामहाराजांना 'गोविंद' म्हणजे श्रीकृष्ण मानीत. साहजिकच मामांचेवर त्यांनी अभंग रचले आहेत. मामांचा अभंगसंग्रह त्यांनी 'अमृतवाणी' या शीर्षकाखाली प्रसिद्ध केला. मामांच्या कीर्तनाचा रौप्यमहोत्सव, त्रितपमहोत्सव त्यांनी मोठ्या थाटामाटाने साजरा केला. तसेच मामांच्या शतकजयंतीचा सोहळाही त्यांनी फार मोठ्या प्रमाणात साजरा केला.

याच काळात निंबरगीकरमहाराजांची द्विशताब्दिक जयंती येत होती. त्या निमित्ताने संस्कृत भाषेत 'संतसहस्रनाम' लिहवून घेतले आणि त्या ग्रंथाचे सामुदायिक पठण करवून घेतले.

इ.स. १९६२मध्ये मामामहाराजांचे निर्वाण झाले. त्यानंतर मामामहाराजांच्या आज्ञेप्रमाणे श्रीदासरामांनी आपले नित्यकीर्तन सुरू केले, व ते अखंड ३९ वर्षे आपल्या निर्वाणापर्यंत चालू ठेवले.

इ.स. १९६२ ते इ.स. २००१ (दासरामांच्या निर्याणाचे वर्ष) या काळात दादांच्या षष्ट्यब्दिपूर्तीचा सोहळा त्यांच्या शिष्यांनी व घरच्यांनी साजरा केला. या निमित्ताने 'दासराम-गौरव-ग्रंथ' प्रकाशित करण्यात आला. त्यांच्या कीर्तनाचे रौप्यमहोत्सव आणि त्रितपमहोत्सव हेही साजरे करण्यात आले. इ. स. १९९० साली श्रीदादांची सत्तरी आली. यानिमित्ताने त्यांची सत्तरी मोठ्या प्रमाणात साजरी झाली. यावेळी 'श्रीदासरामगीतम्' हा संस्कृत काव्यबंध प्रकाशित झाला. पुढे इ.स. १९९५मध्ये दादांना प्रत्यक्ष पंचाहत्तरावे वर्ष लागले. तेव्हा पुनः एकदा दादांच्या पंचाहत्तरीचा सोहळा साजरा करण्यात आला. त्यांची केळ्यांची तुलाही करण्यात आली. इ.स.

२००० साली त्यांना ८०वे वर्ष लागले. यावेळी त्यांना पणतू असल्याने सुवर्णफुले उधळणे आणि सहस्रचंद्रदर्शन हे कार्यक्रमही साजरे झाले. सहस्रचंद्रदर्शनानंतर श्रीदासरामांची प्रकृति खालावत गेली आणि इ.स. २००१मध्ये त्यांचे महानिर्वाण झाले.

## चंद्रशेखरअण्णा

महानिर्वाणापूर्वी श्रीदासरामांनी आपली नित्यकीर्तनाची पद्धति पुढे चालू ठेवण्यास आपले ज्येष्ठ चिरंजीव चंद्रशेखर अण्णा यांना सांगितले होते. दासरामांच्या आज्ञेप्रमाणे त्यांच्या निर्वाणानंतर दुसरे दिवसापासूनच अण्णांनी नित्यकीर्तनाची परंपरा पुढे चालू केली.

चंद्रशेखरअण्णा हे मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. काही कारणाने त्यांना पुढील उच्च शिक्षण घेता आले नाही. त्यांनी सांगली एज्युकेशन सोसायटीच्या ऑफिसात अनेक वर्षे नोकरी केली. पुढे दासरामांच्या आजारपणात त्यांची सेवा करता यावी म्हणून त्यांनी ऐच्छिक सेवानिवृत्ति घेतली. त्यांची पत्नी रोहिणी ही घारपुरे घराण्यातील. या दांपत्याला अंजनी अणि दीपक अशी अपत्ये आहेत. अंजनीचा विवाह झाला आहे. दीपक हा एम्.कॉम. पर्यंत शिकून शेतकरी बँकेत नोकरी करीत आहे. त्याची पत्नी सौ. अनुराधा. या दांपत्याला कु. पार्थ कु. आर्य असे दोन पुत्र आहेत. चंद्रशेखर अण्णांच्या कीर्तनात दीपक हे तबला वाजवून साथ करतात. चंद्रशेखर अण्णांचे कनिष्ठ बंधु अनिलप्रभु हे अण्णांच्या कीर्तनात पेटीची साथ करतात.तसेच सुर्यकांत व अनल हे झांज वाजवून साथ करतात.



वर उल्लेखिलेल्या सर्वांच्या कर्तबगारीने रामनिकेतनची स्थापना आणि विकास झाला.

## श्रीरामनिकेतनची स्थापना आणि विकास

श्री अनंतरावजींनी जो वाडा घेतला होता, त्याचेच रूपांतर हळूहळू रामनिकेतनमध्ये झाले. अनंतरावांच्या वाड्यात दक्षिणोत्तर स्वयंपाकगृह होते. मध्ये दोन खोल्या होत्या व पलीकडे पूर्वपश्चिम सोपा होता. त्याला जोडूनच पूर्वपश्चिम ओटा आणि पडवी होती. आणि पडवीपुढे अंगण होते. या सर्व ठिकाणी प्रथम साधी जमीन होती. मामांच्या कारकीर्दीत सोप्यावर फरशी बसविण्यात आली. दादांच्या कारकीर्दीत ओटा, पडवी आणि अंगण हे फरसबंद करण्यात आले आणि दोनदा मूळच्या वाड्यातही काही नवीन बांधकाम होऊन सुधारणा झाली. पडवीला अर्धी भिंत घालून वर जाळी बसविण्यात आली आणि रामनिकेतनमध्ये शिरण्यास एक मुख्य आणि एक गौण असे दोन जाळीचे दरवाजे बसवण्यात आले. सोप्याच्या पूर्वेकडील डाव्या कोपऱ्यात केळकरांच्या कुलदेवतांच्या मूर्ति होत्या. त्यावर बांधकाम करून त्या बंदिस्त करण्यात आल्या. मामामहाराज सोप्यावर पूर्वाभिमुख बसून कीर्तन करत. त्यांनी तयार करवून घेतलेले तात्यासाहेब कोटणीसमहाराजांचे भव्य चित्र उत्तरेकडील भिंतीच्या मध्यभागी लावण्यात आले.

मामांची नित्यकीर्तने चालू असताना असे घडले :– जमखंडी गावी एका उपेक्षित जागी राम व सीता यांच्या लहान आकाराच्या

गारेच्या मूर्ति सापडल्या. ही गोष्ट मामांचे मित्र अनंतराव म्हसकर यांना कळली. त्यांच्या प्रेरणेने या मूर्ति मामांना देण्याचे ठरले. त्याला मामांनी संमति दिली. तेव्हा सांगलीतील खाडिलकर नावाचे गृहस्थ जमखंडीला गेले आणि त्या मूर्ति डोक्यावर घेऊन सोवळ्याने चालत सांगलीत आणल्या. या मूर्तींच्या स्थापनेसाठी मामामहाराजांनी एक देव्हारा करवून घेतला व त्यात त्या मूर्तींची स्थापना पश्चिमाभिमुख केली.

तात्यासाहेब कोटणीसमहाराजांनी साधुमहाराजांचा प्रसाद म्हणून एक जोड रुद्राक्ष मामामहाराजांना दिला होता. त्याचीही स्थापना मामांनी देव्हाऱ्यात केली.

इ.स. १९२७ साली गुरुपौर्णिमेच्या दिवशी मामांचे नित्यकीर्तन चालू असताना कोणातरी अज्ञात व्यक्तीने रामसीतेच्या मूर्तीपुढे पादुकांचा एक जोड आणून ठेवला. त्या पादुकांची अधिक माहिती कळली नाही. तेव्हा त्या पादुका कोटणीसमहाराजांच्या आहेत असे मानून त्यांचीही स्थापना देव्हाऱ्यात करण्यात आली. त्यासाठी देव्हाऱ्यात थोडी वाढ करण्यात आली.

सिटी हायस्कूलमध्ये नोकरीत असताना नोकरी सोडून श्रीमामामहाराजांनी आपले ३ ।। कोटि रामनामाचे पुरश्चरण पूर्ण केले. त्याच दिवशी इकडे मिरज गावी वेणाबाई मठाचे अधिपति रामचंद्रबुवा रामदासी यांना प्रेरणा झाली की रामदासस्वामींनी रक्षक म्हणून वेणाबाईंना दिलेला 'प्रसादमारुति' हा सांगलीतील मामामहाराज केळकरांना देऊन यावा. त्याप्रमाणे ते प्रसादमारुति घेऊन आले व तो त्यांनी



मामामहाराजांचे स्वाधीन केला. रामसीतेच्या पुढे जरा खाली या मारुतीची स्थापना मामामहाराजांनी केली.

इ.स.१९३९ साली कोटणीसमहाराजंचे चिरंजीव श्रीबाबूरावजी यांनी कोटणीसमहाराजांच्या चर्मी पादुका मामामहाराजांना प्रसाद म्हणून दिल्या. त्यांचीही स्थापना मामांनी देव्हाऱ्यात केली.

चिमड मठातल्या रथोत्सवाप्रमाणे आपल्या रामनिकेतनमध्येही रथोत्सव करावा असे मामामहाराजांनी ठरविले. त्याप्रमाणे त्यांनी एक रथ तयार करवून घेतला. सांगलीत गणपति या देवतेची पालखी निघते. तशी पालखी आपणही काढावी म्हणून मामामहाराजांनी एक पालखीही तयार करवून घेतली.

मामामहाराजांना संतसज्जनांचे फोटो लावण्याची फार हौस होती. त्याप्रमाणे त्यांनी रामनिकेतनच्या चारी बाजूंवर अनेक फोटो लावून घेतले होते. दादांच्या कारकीर्दीतही अनेक फोटो लावण्यात आले. या फोटोंमध्ये चंद्रशेखर अण्णांनी भर घातली. चिमड संप्रदायातील सर्व संतांचे फोटो इत्यादि लावून त्यांनी फोटोंच्या संख्येत वाढ केली.

मामामहाराज विद्यमान असताना देव्हारा तीन बाजूंनी उघडा होता. भक्तमंडळी देवांच्या मूर्तींवर तांदूळ, फुले वगैरे उधळीत. त्यामुळे देव्हाऱ्यात मुंग्या इत्यादींचा उपद्रव होऊ लागला. तेव्हा दादांचे कारकीर्दीतच चंद्रशेखर अण्णांनी देव्हाऱ्याला तीन बाजूंनी काचा लावून देव्हारा बंदिस्त केला.

मामामहाराज सोप्याच्या पश्चिमेकडील भिंतीच्या मध्यभागी

खुर्चीत बसून, पश्चिमाभिमुख देव्हाऱ्याकडे तोंड करून कीर्तन करीत. त्यांच्या निर्वाणानंतर दासराममहाराजांनी त्याच स्थानी मामांचे शिलासिंहासन स्थापन केले. व त्याच्यावर आवश्यक तो मजकूर लिहवून घेतला. तसेच मामामहाराजांचे एक मोठे तैलचित्र तयार करवून घेऊन ते मामांच्या सिंहासनाच्या वरच्या बाजूवरील भिंतीवर लावले. तसेच मामांच्या पितळी पादुका तयार करवून घेऊन, त्या देव्हाऱ्यातील एका खणात स्थापन केल्या.

मामामहाराजांच्या निर्वाणानंतर दासराम सोप्यावरील उत्तरेकडच्या भिंतीच्या कोपऱ्यात खुर्चीवर बसून कीर्तन करीत. खुर्चीच्या मागे असणाऱ्या खोलीत जाण्यास दरवाजा होता. दासराममहाराजांच्या निर्वाणानंतर चंद्रशेखरअण्णांनी तो दरवाजा काढून टाकून तेथे सपाट भिंत तयार करवून घेतली. मामांच्या शिलासिंहासनाप्रमाणे, त्यांनी दादांचे शिलासिंहासन तयार करवून घेतले व यथासांगपणे त्याची स्थापना केली. तसेच दासराममहाराजांचे मोठे तैलचित्र तयार करवून घेऊन, ते सिंहासनाच्या वरच्या बाजूस भिंतीवर लावले. नंतर त्यांनी अनंतरावांचाही फोटो मामांच्या फोटोच्या उजव्या बाजूस लावला. उत्तरेकडील भिंतीत तात्यासाहेबमहाराजांच्या फोटोखाली जे लाकडी कपाट होते त्याला वाळवी लागल्याने ते काढून टाकून तेथे चिमड संप्रदायातील साधूंचे फोटो काचेने बंदिस्त करून लावले. तसेच दासराममहाराजांच्या पितळी पादुका तयार करवून घेऊन त्यांची स्थापना मामांच्या पादुकांशेजारी केली.

मामामहाराज हयात असताना कीर्तनाचे वेळी अर्गीन लावण्यात



येई. पुढे घरात वीज घेण्यात आली. मग विजेच्या दिव्यात कीर्तने सुरू झाली. दासराममहाराजांच्या कारकीर्दीत रामनिकेतनात विजेचे पंखे बसविण्यात आले आणि अनेक ट्युबा लावण्यात आल्या. आता तर रामनिकेतनात चंद्रशेखर अण्णांनी सुंदर रंगकाम करून घेतले आहे आणि महत्त्वाच्या फोटोंना हार घातले आहेत.

## श्रीरामनिकेतनाची थोरवी

इ.स. १९२४पासून इ.स. २००९पर्यंत रामनिकेतनमध्ये सतत ७५ वर्षे नित्याचे हरिकीर्तन चालू आहे ही गोष्ट मुळात अपूर्व आहे. आणखी असे की एकाच कुळातील तीन पुरुषांनी ही कीर्तनाची परंपरा सातत्याने चालू ठेवली आहे हेही गौरवास्पद आहे. साहजिकच अशा रामनिकेतनविषयी आदर वाटणे साहजिक आहे. असे असल्यामुळे परगावहून येणाऱ्या अनेक संतमहंतांनी श्रीरामनिकेतनला भेटी दिल्या आहेत, हे येथे नमूद करणे आवश्यक आहे. काहींनी तर या रामनिकेतनची थोरवी पुढीलप्रमाणे सांगून ठेवली आहे :-

''हे नाथांचे घर आहे,''असे शब्द संतचरित्रकार दासगणू यांनी उच्चारले.''सांगलीत पहाण्यासारखे बापूरावांचे घर आहे,'' असे उद्गार मालाडच्या केतकरमहाराजांनी काढले.''ज्ञानेश्वरीत वर्णन केलेल्या निगूढ मठाप्रमाणे रामनिकेतन आहे,''असे नीळकंठ भारतींचे मत आहे. ''रामनिकेतनमधील वातावरण शुद्ध आहे,'' असे उद्गार तराणेकरमहाराजांनी काढले होते. मधुकर शिपूरकर लिहितात,

''दादांच्या घरी जाणाऱ्याला आपण एका निराळ्या विश्वात वावरत असल्याचा भास झाल्याशिवाय रहात नाही. हे विश्व बाह्य भौतिक विश्वापेक्षा फार निराळे आहे हे नंतर कळते. इथले वातावरण इतके भारलेले आहे की नकळत माणूस त्या वातावरणात मंत्रमुग्ध झाल्याशिवाय रहात नाही.''

एकदा मधुकर शिपूरकर आपल्या दोन भौतिक नास्तिकवादी मित्राबरोबर रामनिकेतनात आले होते. रामनिकेतनमधून बाहेर आल्यावर ते भौतिकवादी मित्र म्हणाले,"तेथील Atmosphere फार charing आहे. मनाला एक प्रकारची शांति मिळाली. बाहेर भयंकर उष्मा असताना एकदम 'एअरकंडिशण्ड' रूममध्ये प्रवेश केल्यावर जसे शरीराला गार वाटते तसे मनाला वाटले." चिन्मयानंद स्वामींनी म्हटले''इथल्या खिडक्या, दारे, भिंती, तुळयासुद्धा कीर्तन करतील इतके इथले वातावरण नाममय झाले आहे.''

सांगलीत भजनपटु पदवी असणारे श्री. मोरोपंत कुलकर्णी होते. त्यांनी काही काव्य केले. त्यातील रामनिकेतनसंदर्भातील भाग असा :-

धन्य सदन ते ठरले कीर्तनघोषे अखंड दुमदुमले ।
श्रवणे मनने विरळे अद्वयभजने उदंड जन रमले ।।१।।
गुरुशिष्य उभयतांनी नामाचे गुपीत प्रगट दाखवीले ।
कृष्णातीरी कीर्तनी निजबोधे अढळ स्थान राखियले ।।२।।
साधनमार्ग क्रमुनी भक्तांही श्रेष्ठ ज्ञान सांगितले ।
नरजन्म श्रेष्ठ जाणुनी भगवंता सर्वकाळ वाहियले ।।३।।



संतचरित्रे गाऊनि घातली अडी मुक्तिपेढी मामांनी ।
कीर्तनपंथा राखुनि चालविली घडी तरीत सुतानी ।।४।।

सांगलीत कविवर्य मा. श्रीरंग विष्णु जोशी वास्तव्य करून आहेत. ते रामनिकेतनमध्ये येत असतात. त्यांनी रामनिकेतनचा महिमा पुढील प्रमाणे वर्णिला आहे :-

गंगा, सिंधु नको, सरस्वति नको, ती चंद्रभागा नको ।
काशीक्षेत्र नको, हिमालय नको, कन्याकुमारी नको ।
वैराग्यासम दूर घोर विपिनीं ते हिंडणेही नको ।
तू या रामनिकेतनास त्यजुनी कोठेहि जाऊ नको ।।१।।
गीता सद्गुरुची प्रतिष्ठित करी, यात्रा रथाची असे ।
गाभारा उजळे, प्रकाश पसरे जो अंतरंगी वसे ।
होता तीन प्रदक्षिणा भय मनी तापत्रयाचे नको ।
तू या रामनिकेतनास त्यजुनी कोठेहि जाऊ नको ।।२।।
तीर्थे सर्व पहा इथे प्रगटली ओवी अभंगातूनी।
श्वासांचे तुझिया निनाद घुमती येथे मृदंगातुनी ।
मामांचा कर रामपाठ, कधिही नामास सांडू नको ।
तू या रामनिकेतनास त्यजुनी कोठेहि जाऊ नको ।।३।।
आले संत किती, तया न गणती या व्यासपीठावरी ।
भक्तीची दुसऱ्या फुले उधळुनी केली उभी पंढरी ।
टाळांच्या गजरामध्येहि मनिंचा तू मंत्र सोडू नको ।
तू या रामनिकेतनास त्यजुनी कोठेहि जाऊ नको ।।४।।

दादांना बघता क्षणी विसरतो प्रापंचिकाचे जिणे ।
गंगेच्या वरती हळू पसरते कोजागिरी चांदणे ।
गंगाजळ अंतरात भरणे डोळे भरू तू नको ।
तू या रामनिकेतनास त्यजुनी कोठेहि जाऊ नको ।।५।।

## श्रीरामनिकेतन : नित्याचे कार्यक्रम

### मामांचे वेळी

**: सकाळी ७ ते ९ :**

पूजा, आरती, दासबोधवाचन, नित्यपाठ अभंग

**: संध्याकाळी ५.३० ते ८.३०:**

दासबोध, ज्ञानेश्वरी इत्यादींवरील प्रवचन,
नंतर कीर्तन, कीर्तनोत्तर पंचपदी व आरती.

(टीप – काही वर्षे मामांनी प्रतिएकादशीला कीर्तनानंतर वारकरी पद्धतीचे निरूपण केले.)

### दादांचे वेळी

**: सकाळी ७ ते ९ :**

पूजा, आरती, दासबोधवाचन, नित्यपाठ अभंग

**: संध्याकाळी ६ ते ८ :**

रामपाठ पठण, कीर्तन, पंचपदी, आरती.



### चंद्रशेखरांचे वेळी

**: सकाळी ७ ते १०:**

पूजा, नामाचा समास, बारा अभंग, रामनामजप,
मारुतिस्तोत्र इत्यादि.

**: संध्याकाळी ५.३० ते ८.३०:**

रामपाठ, कीर्तन, पंचपदी व आरती.

[टीप – रामनिकेतनमध्ये पठण केले जाणारे अभंग इत्यादि सर्व ‘चिन्मय नित्यपाठ’(आवृत्ति ५वी) या छोट्या ग्रंथात आहे.]

## श्रीरामनिकेतन : नैमित्तिक कार्यक्रम

### (१) कीर्तने (जादा)

| | | |
|---|---|---|
| गोकुळअष्टमी | – | कृष्णजन्माचे कीर्तन |
| गुरुतृतीया | – | पर्वकाळाचे कीर्तन |
| गोविंदनवमी | – | मामांच्या आराधनेचे कीर्तन |

### (२) महापूजा

| | | |
|---|---|---|
| शनैश्चर जयंती | अभिषेक | वैशाख वद्य १५ |
| वटसावित्री | महापूजा | ज्येष्ठ पौर्णिमा |
| गणेशचतुर्थी | महापूजा | भाद्रपद शुद्ध ४ |
| अनंतचतुर्दशी | महापूजा | भाद्रपद वद्य १४ |
| हनुमानव्रत | महापूजा | मार्गशीर्ष वद्य १३ |

## (३) संतमहंतांची पुण्यस्मरणे

१. निंबरगीकरमहाराज जयंती
२. निंबरगीकरमहाराज अनुग्रह दिन
३. सौ. सीतावहिनी केळकर जयंती
४. शिवरामबुवा ब्रह्मचारी पुण्यतिथि
५. चिमडमहाराज जयंती
६. नारायणमहाराज जयंती
७. रा. द. रानडे पुण्यतिथि
८. आईसाहेब कोटणीस पुण्यतिथि
९. गोपाळकाका कोटणीस पुण्यतिथि
१०. नरसाप्पा शापेटी पुण्यतिथि
११. अनंतरावजी केळकर पुण्यतिथि
१२. गुरुपौर्णिमा
१३. नामदेवमहाराज पुण्यतिथि .
१४. नागाप्पाणामहाराज पुण्यतिथि
१५. दासराममहाराज केळकर जयंती
१६. दाजीसाहेबमहाराज पुण्यतिथि
१७. दादामहाराज कोटणीस पुण्यतिथि
१८. आद्य रघुनाथाचार्य पुण्यतिथि
१९. बहिणाबाई कोटणीस पुण्यतिथि
२०. गोपाळराव  दीक्षित पुण्यतिथि
२१. लक्ष्मण दीक्षित पुण्यतिथि



२२. तात्यासाहेब कोटणीसमहाराज जयंती
२३. कोटणीसमहाराज पादुकाप्राप्ति दिन
२४. उद्धवराव यरगट्टीकर पुण्यतिथि
२५. तात्यासाहेब कोटणीसमहाराजांना चिमडमहाराजांच्या पादुका प्राप्तीचा दिन
२६. बाबासाहेब मजुमदार पुण्यतिथि
२७. तात्यासाहेब कोटणीसमहाराज अनुग्रह दिन
२८. पांडुरंगमहाराज ताम्हनकर पुण्यतिथि
२९. अंबुरावमहाराज पुण्यतिथि
३०. उमदीकरमहाराज पुण्यतिथि
३१. मामामहाराज केळकर कीर्तनाचा वाढदिवस
३२. सौ. जानकीवहिनी कोटणीस पुण्यतिथि
३३. सौ. राधाबाई केळकर पुण्यतिथि
३४. मामामहाराज केळकर अनुग्रह दिवस
३५. सौ. लक्ष्मीबाई केळकर पुण्यतिथि
३६. माईसाहेबमहाराज यरगट्टीकर पुण्यतिथि
३७. सौ. सीतावहिनी केळकर पुण्यतिथि
३८. रेवणसिद्ध प्रगटदिन

-----

## (४) पालखी

१. गुढी पाडवा. २. रामदासस्वामी पुण्यतिथी

## (५) रथ

१. रामनवमी, २. हनुमान जयंती, ३. गुरुलिंगगीता जयंती, ४. आषाढी एकादशी, ५. ज्ञानेश्वरमहाराज पुण्यतिथि, ६.देवदीपावली, ७. रथसप्तमी, ८. गुरुप्रतिपदा, ९. गुरुतृतीया, १०. मामामहाराज केळकर जयंती, ११. तुकारामबीज, १२. एकनाथ षष्ठी.

## (६) रथ आणि पालखी

महत्त्वाचे प्रसंगी

-----

आराधनांची व कार्यक्रमांची तिथिवार सूची शेवटी जोडलेली आहे.



## आराधनेचे कार्यक्रम

| अ. क्र. | कार्यक्रमाचे नांव | तिथी | विशेष कार्यक्रम |
|---|---|---|---|
| १. | श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज पुण्यतिथि | चैत्र शु.३ | आराधना दु. ४ ते ५ |
| २. | श्रीनिंबरगीकरमहाराज पुण्यतिथि | चैत्र शु.१२ | आराधना रा. १० ते ११ |
| ३. | श्रीदासराममहाराज केळकर पुण्यतिथि | श्रावण शु.६ | आराधना सायं ७ ते ८ |
| ४. | महायोगिनी लक्ष्मीबाईअक्का पुण्यतिथि | आश्विन शु.३ | आराधना स. ९ ते १० |
| ५. | श्रीरामचंद्रमहाराज यरगट्टीकर पुण्यतिथि | मार्गशीर्ष शु.११ | आराधना रा. ९ ते १० |
| ६. | श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस पुण्यतिथि | पौष शु.६ | आराधना दु. ४ ते ५ |
| ७. | सौ.इंदिराबाई केळकर पुण्यतिथि | माघ शु.४ | आराधना दु. ३ ते ४ |
| ८. | श्रीमामामहाराज केळकर पुण्यतिथि | माघ शु.९ | आराधना रा. ११ ते १२ |
| ९. | श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर पुण्यतिथि | माघ शु.१० | आराधना सायं. ७ ते ८ |
| १०. | तुकाराम बीज | फाल्गुन व.२ | आराधना स.९ ते १० |

## कार्यक्रमांची तिथिवार सूची

| अ.क्र | कार्यक्रमाचे नांव | तिथी | विशेष कार्यक्रम |
|---|---|---|---|
| १. | गुढीपाडवा | चैत्र शु.१ | पालखी |
| २. | श्रीराम नवमी | चैत्र शु.९ | रथोत्सव |
| ३. | श्रीहनुमान जयंती | चैत्र पौर्णिमा | रथोत्सव |
| ४. | श्रीनिंबरगीकरमहाराज जयंती | चैत्र पौर्णिमा | पुण्यस्मरण |
| ५. | सौ.सीतावहिनी केळकर जयंती | वैशाख शु.१० | पुण्यस्मरण |
| ६. | गुरुलिंगगीता जयंती | वैशाख व.७ | रथोत्सव |
| ७. | श्रीरामचंद्रमहाराज यरगट्टीकर जयंती | ज्येष्ठ शु.१० | पुण्यस्मरण |
| ८. | श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर जयंती | ज्येष्ठ शु.१० | पुण्यस्मरण |
| ९. | श्री. रा. द. रानडे पुण्यतिथि | ज्येष्ठ शु.१० | पुण्यस्मरण |
| १०. | सौ. लक्ष्मीबाई ऊर्फ आईसाहेबमहाराज कोटणीस पुण्यतिथि | ज्येष्ठ व. ५ | पुण्यस्मरण |
| ११. | आषाढी एकादशी | आषाढ शु.११ | रथोत्सव |
| १२. | अनंत गंगाधर केळकर पुण्यतिथि | आषाढ शु.१२ | पुण्यस्मरण |
| १३. | गुरु पौर्णिमा | आषाढ पौर्णिमा | पुण्यस्मरण |
| १४. | श्रीनागाप्पाण्णामहाराज पुण्यतिथि | श्रावण व.२ | पुण्यस्मरण |
| १५. | श्रीदासराममहाराज केळकर जयंती | श्रावण व.६ | पुण्यस्मरण |



| अ.क्र | कार्यक्रमाचे नांव | तिथी | विशेष कार्यक्रम |
|---|---|---|---|
| १६. | गोकुळ अष्टमी | श्रावण व.८ | जन्मकाळ रात्री ११ वा. |
| १७. | श्रीदाजीसाहेबमहाराज यरगट्टीकर पुण्यतिथि | भाद्रपद शु.३ | पुण्यस्मरण |
| १८. | श्रीदादामहाराज कोटणीस पुण्यतिथि | भाद्रपद शु.६ | पुण्यस्मरण |
| १९. | श्री लक्ष्मण दीक्षित पुण्यतिथि | कार्तिक शु.७ | पुण्यस्मरण |
| २०. | श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस जयंती | कार्तिक शु.८ | पुण्यस्मरण |
| २१. | श्रीज्ञानेश्वरमहाराज पुण्यतिथि | कार्तिक व.१३ | रथोत्सव |
| २२. | देवदीपावली | मार्गशीर्ष शु.१ | रथोत्सव |
| २३. | श्रीउद्धवरावमहाराज यरगट्टीकर पुण्यतिथि | मार्गशीर्ष शु.६ | पुण्यस्मरण |
| २४. | श्रीसाधुमहाराज पादुका स्थापना दिन | मार्गशीर्ष व.७ | धुंधुर मास |
| २५. | श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर पुण्यतिथि | मार्गशीर्ष व.१४ | पुण्यस्मरण |
| २६. | श्रीअंबुरावमहाराज पुण्यतिथि | पौष शु.६ | पुण्यस्मरण |
| २७. | श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर पुण्यतिथि | माघ शु.३ | पुण्यस्मरण |

| अ.क्र | कार्यक्रमाचे नांव | तिथी | विशेष कार्यक्रम |
|---|---|---|---|
| २८. | रथसप्तमी | माघ शु.७ | रथोत्सव |
| २९. | गुरुप्रतिपदा | माघ व.१ | रथोत्सव |
| ३०. | श्रीमामामहाराज केळकर कीर्तन वाढदिवस | माघ व.१ | पुण्यस्मरण |
| ३१. | गुरुतृतीया | माघ व.३ | रथोत्सव |
| ३२. | श्रीरामदासस्वामी पुण्यतिथि | माघ व.९ | पालखी |
| ३३. | माईसाहेबमहाराज यरगट्टीकर पुण्यतिथि | माघ व.११ | पुण्यस्मरण |
| ३४. | श्रीमामामहाराज केळकर जयंती | फाल्गुन शु.१० | रथोत्सव |
| ३५. | सौ.सीतावहिनी केळकर पुण्यतिथि | फाल्गुन शु.१० | पुण्यस्मरण |
| ३६. | एकनाथ षष्ठी | फाल्गुन व.६ | रथोत्सव |

******

## ❖ श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प यादी ❖

| पुस्तकाचे नांव | पुष्प क्रमांक | सन |
|---|---|---|
| चिमड संप्रदाय | १ | २००५ |
| श्रीरामदासस्वामी चरित्र | २ | २००६ |
| भजन तरंग | ३ | २००६ |
| हरिपाठ संकीर्तन | ४ | २००७ |
| श्रीदासराममहाराज नित्यपाठ चरित्र | ५ | २००७ |
| दासबोधातील तत्त्वज्ञान | ६ | २००७ |
| श्रीदासराममहाराजांचा वचनसंग्रह | ७ | २००८ |
| श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज चरित्र | ८ | २००९ |
| साधन संध्या | ९ | २००९ |
| अनंत अमृत स्मरण | १० | २००९ |
| श्रीगुरु महिमा | ११ | २००९ |
| श्रीज्ञानेश्वरी प्रसाद | १२ | २००९ |
| श्रीदासराम गाथा : पुरवणी | १३ | २००९ |
| श्रीदासराममहाराज आत्मचरित्र | १४ | २०१० |
| श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांचे चरित्र | १५ | २०१० |
| श्रीदासराममहाराज : श्लोकरचना | १६ | २०१० |
| ज्ञानदेवकृत अनुभवामृत ओवी टीकेसहीत | १७ | २०१० |
| श्रीदासराममहाराज सहस्रनामस्तोत्रम् | १८ | २०१० |
| आत्माराम (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह) | १९ | २०१० |
| श्रीगुरुलिंगगीता (कानडी लिपीत) | २० | २०१० |
| श्रीगुरुलिंगगीता (५५ पदे मराठीत) | २१ | २०१० |